# माहितीचा अधिकार अधिनियम २००५
# कलम ४ (ख) प्रमाणे माहितीची प्रसिध्दी
# सन २०२५

## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१

**Pro-active Disclosure under**

**Section ४(१) (b) of the Right To Information Act २००५**

**१. The particulars of organisation, functions and duties**

**(रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील)**

- सहकारी अर्थ व्यवस्था ग्रामीण जनता, आर्थिक व सामाजिक पीडित शोषितांच्या उत्कर्षाचे आशा स्थान म्हणून मान्यता पावलेली असून तिने गेल्या शतकामध्ये सर्व व्यापी स्वरूप प्राप्त केलेले आहे. व्यक्तीच्या ग्रामीण शेती विषयक गरजांपासून ते ग्राहक वस्तू वितरण, औद्योगिक प्रक्रिया, इतकेच नव्हे तर सहकारी रुग्णालयांपर्यंत लक्षणीय वाटचाल झाली आहे.
- सहकारी संस्थांची संख्या सन १९६१ मध्ये ३१,५६५ होती व मार्च २०२३ अखेर ती २,२४,८४७ इतकी झालेली आहे. सभासद संख्या सन १९६१ मध्ये ४२ लाख होती व मार्च २०२३ अखेर ती ५८७ लाख (अस्थायी ) इतकी झालेली आहे.
- या सहकारी संस्थांचे संचालन व प्रशासन सहकार खाते व त्या अंतर्गत असलेली दोन संचालनालये अनुक्रमे पणन संचालनालय, पुणे व हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर आणि साखर आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत केले जाते.

- **विभाग १ - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा. पुणे यांच्या नियंत्रणाखालील विषय :-**
  १. संचालन व प्रशासन
  २. लेखापरिक्षण
  ३. सहकारी पत संस्था
  ४. औद्योगिक सहकारी संस्था (हातमाग व यंत्रमाग व्यतिरिक्त)
  ५. सहकारी गृहनिर्माण संस्था
  ६. इतर सहकारी संस्था
  ७. शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण
  ८. सावकारी परवाने

- **विभाग २ - साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या नियंत्रणा - खालील विषय :-**

  १. सहकारी साखर कारखाने.

- **विभाग ३ - संचालक कृषि पणन, म.रा. पुणे यांच्या नियंत्रणा खालील विषय:-**

१. वखार
२. सहकारी प्रक्रिया संस्था (सावकारी साखर कारखाने वगळून)
३. सहकारी पणन संस्था
४. सहकारी गोदामे
५. सहकारी ग्राहक संस्था
६. कृषि उत्पन्न बाजार समित्या
७. पणन सर्वेक्षण व संशोधन
८. एकसूत्री बाजार वृत्तसंस्था योजना.

**वस्त्रोद्योग विभाग**

प्रास्ताविक - मार्च ८९ पासून पातळीवर कृषि व सहकार विभाग हयांचे विभाजन होऊन सहकार व वस्त्रोद्योग विभाग हा स्वंतत्र विभाग निर्माण करण्यात आला. या विभागात खालील कार्यालयांचे कामकाज अंतर्भूत करण्यात आले आहे.

- **वस्त्रोद्योग संचालनालय, म.रा. नागपूर यांच्या नियंत्रणाखालील विषय:-**

१. हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्था
२. सहकारी सूतगिरण्या

- **रेशीम संचालनालय, म.रा. नागपूर यांच्या नियंत्रणाखालील विषय:-**

१. रेशीम उद्योग

**२. The powers and duties of officers and employees**

**(अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये)**

सहकार आयुक्त व अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदा-या

१. सहकारी संस्था व उपविधी नोंदणी (क. ९) आणि त्याच्या सुधारणा (क. १३ व क. १४) यांची नोंदणी करणे आणि नोंदणीचे प्रमाण पत्र देणे (क. १०)
२. सदस्य होऊ पाहणारा इसम शेतकरी आहे किंवा नाही, किंवा त्याचे रहाण्याचे ठिकाण संस्थेच्या कार्यक्षेत्रात आहे किंवा नाही याचा निर्णय देणे (क. ११)
३. संस्थांचे वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी प्रसिद्ध करणे (क. १२) (३ अ) उपविधींची सुधारणा नोंदणी नाकारणे (क. १३) आणि उपविधी सुधारणा करण्याचा निर्देश देणे (क. १४)
४. संस्थेच्या नांव बदलास मंजूरी देणे (क. १५)
५. संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी किंवा रूपांतर यास मंजूरी देणे (क. १७)
६. संस्थांचे एकीकरण किंवा पुनर्रचना करण्याचा निर्देश देणे (क. १८)
७. संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे (क. १९)
८. संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे (क. २०)
९. संस्थेची नोंदणी रद्द करणे (क. २१)
१०. एखाद्या संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीने केलेले अपील निकालात काढणे (क. २३)
११. सदस्याची संस्थेतून हकालपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देणे किंवा सदर सदस्यास पुनः सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास संमती देणे (क. ३५)
१२. एका सहकारी संस्थेने दुस-या संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे (क. ४४)
१३. समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात बुध्दी पूरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर समितीने सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील व अशा परिस्थितीत कलम ७७ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे.
१४. एखाद्या संस्थेच्या किंवा संस्था वर्गाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, व्यवस्थापक, सचिव लेखापाल व इतर कोणताही पदाधिकारी यांच्या नियुक्तीसाठी लागणाऱ्या अर्हता आणि यांच्या वित्तलब्धी व वेतनेतर परिलब्धी निर्धारित करणे . (क. ७४)
१५. वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्यात किंवा तिचे पुढे ताळेबंद वगैरे ठेवण्याच्या बाबतीत कसून कराणारा (कलम ७५) किंवा विशेष साधारण सभा बोलावण्यिात कसून करणारा (कलम ७६) अधिकारी किंवा समितीचा सदस्य यांस निवडणुकीस अपात्र ठरविणे किंवा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास रू. ५०००/- पर्यंत दंड करणे.
१६. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविणे किंवा ती बोलावण्याचा एखादया इसमास अधिकार देणे (कलम ७६)
१७. समितीच्या सदस्यांची नियुक्ती, नवीन समिती, समितीची घटना करीत असते वेळी कोणताही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्वीकारणे यावेळी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे (क.७७)
१८. समिती कर्तव्ये पार पाडण्यात कसून करीत असेल, निष्काळजीपणा करीत असेल, तिची कामे उचितरित्या व साक्षेपाने पार पाडीत नसेल वा सदस्यांचा राजीनामा निरर्हता यामुळे किंवा प्रशासकांची समिती नेमणे (क.७८).

१९. समिती सदस्याने संस्थेच्या हितास बाधा, कृती निवडणूक घेण्यास कसूर वा समितीची कामे पार पाडणेस नाकारणे व थांबवणे, गंभीर वित्तीय बाबी, अफरातफरी व न्यायिक निदेश गणपूर्ती होत नसेल तेथे समिती अथवा संचालक वा सदयस निष्प्रभावित करणे .(क.७८-क)

२०. विवरणपत्रे दाखल करण्यास फर्माविणे (क.७९)

२१. संस्थेचे दप्तर आणि मिळकतीचा ताबा घेणे (क.८०).

२२. संस्थेने लेखापरीक्षक नियुक्ती न केल्यास पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे (क.८१) आणि हिशेबातील दोष सुधारण्याचा संस्थेस आदेश देणे. (क.८२)

२३. संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती यासंबंधी चौकशी करणे (क.८३)

२४. धनको संघीय संस्थेच्या अर्जावरून वा स्वत:हून शासकीय रकमांसाठी ऋणको संस्थेची तपासणी घेणे (कलम ८४)

२५. चौकशी किंवा तपासणी याचे खर्चाबद्दल हुकूम करणे (क.८५) आणि ती वसूल करणे (क.८६)

२६. संस्थेची पुस्तके तपासणे किंवा ती तपासून घेणे (क.८४)

२७. चौकशी अथवा तपासणीत उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे आणि त्यासाठी उपाययोजना करण्याविषयी निदेश देणे (क.८७).

२८. अपराधी, प्रवर्तक वगैरे विरुध्द नुकसानी आकारणे (क.८८)

२९. साक्षीसाठी हजर राहणेकरिता किंवा कोणताही दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडणे.(क.८९)

३०. संस्थेच्या कारभाराचे निरिक्षण/तपासणी करणे (क.८९-अ)

३१. विविक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची रक्कम, जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूली साठी दाखला करणे (क.१०१)

३२. सहकारी संस्थेचे व्यवहार गुंडाळण्याचे आदेश करणे (क.१०२) ऋणपरिशोधकाची नेमणूक करणे (क.१०३)

३३. अवसायनातील संस्थांचे ऋणपरिशोधनासाठी ऋणकोकडून वसुली करणे व धनकोला प्राधान्याने नुसार अदा करणे (क.१०५)

३४. रिझर्व्ह बँक ऑप इंडियाचे मंजुरी व मागणी केल्यावरुन विमा उतरविलेल्या बँकांचे समापन करणे, तिची पुर्नरचना करणे, तिची समिती निष्प्रभावित करणे, वगैरे संबंधित आदेश देणे (क.११० -अ)

३५. सहकारी कृषि आणि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेचे सदस्यांना दिलेल्या कर्ज रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र देणे (क.१३७)

३६. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे अंतर्गत नोंदणीकृत संस्थेव्यतिरिक्त इतरांना सहकारी या शब्दाचा वापर करण्यास मनाई करणे (क.१४५)

३७. कलम १४६ मधील अपराधाबाबत कलम १४७ अन्वये न्यायीक चौकशीसाठी प्रकरण चालविण्यास कलम १४८ (३ नुसार) परवानगी देणे.

३८. सहकारी संस्थांचे निवडणुकीतील उमेदवारी नामनिर्देशन नामंजुरीबाबत अर्जावरुन अपिल एकूण निकाल देणे (क.१५२-अ)

३९. कलम ४, ९, ११, १२, १३, १४, १७, १८, १९, २१, २९, ३५, ७७अ, ७८, ७९, ८८, १०५ यांचेवरील अपिलाचे अर्ज स्विकारून निर्णय देणे. (क.१५२)

४०. कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयावर पुर्ननिरिक्षण करणे (सुनावणीचे अधिकार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन) व त्यांचेपेक्षा वरीष्ठ अधिकारी यांना आहेत. (क.१५४)

४१. संस्थेकडून शासनास देय रकमाची वसुली करणे (कलम १५५)

४२. मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून विवक्षित रक्कम वसुल करणे (क.१५६)

४३. महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत संस्थेस राज्याबाहेर व राज्याबाहेरील संस्थेस राज्यात शाखा उघडण्यास परवानगी देणे. (क.१५९)

तळटीप: निबंधक व त्यांचे अधिनस्त अधिकारी हे लोकसेवक आहेत. त्यांनी सदभावना पूर्वक केलेल्या कृत्या बद्दल वाद, खटला, कायदयाशीर कार्यवाही दाखल करता येणा नाही. (कलम १६१, कलम १६२)

***************

## ३. The procedure followed in the decision making process, including channels of supervision and accountability

**(निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली )**

### सहकार खात्याची क्षेत्रीय रचना

**अपर मुख्य सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)**

↓

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म. रा. पुणे (राज्यस्तर मुख्यालय)**

| ↓ | ↓ |
|---|---|
| **विभागीय सहनिबंधक (विभागस्तर)** | **विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) (विभागस्तर)** |
| ↓ | ↓ |
| **जिल्हा उपनिबंधक (जिल्हास्तर)** | **जिल्हा विशेष लेखापरिक्षक (जिल्हास्तर)** |
| ↓ | ↓ |
| **तालुका / वॉर्ड उप / सहाय्यक निबंधक (तालुकास्तर)** | **तालुका लेखापरिक्षक (तालुकास्तर)** |

**४. The norms set by it for the discharge of its functions**

**(स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी ठरविण्यांत आलेली मानके )**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

**५. The rules, regulations, instructions, manuals and records held by it or under its control or used by its employees for discharging its functions**

**(त्याच्याकडील असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यांत येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख )**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४

**६. A statement of the categories of documents that are held by it or under its control (त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण )**

वर्गीकरण प्रकार A (कायम स्वरूपी ठेवावयाची कागदपत्रे)

- सहकारी संस्थेची नोंदणी व पोट नियम नोंदणी धारिका,
- विभागीय सूचना पुस्तिका (Manual),
- S.O. File (स्थायी आदेश धारिका),
- शासन निर्णय,
- भौगोलिक बदल आदेश,
- कागदपत्रे वर्गीकरण यादी,
- अभिलेख सूची,
- निवाडा व डिक्री आदेश,
- जडवस्तूसंग्रह नोंदवही,
- GIS नोंदवही,
- ग्रेडेशन लिस्ट
- बाजार क्षेत्र जाहीर करणे व शेत माल वस्तूंचे नियमन आदेश
- म. स. सं. नियम १९६१ चे नियम ३० अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- आर्थिक प्रस्ताव
- नमूनेदार उपविधी
- नोंदणी क्रमांक वितरण

वर्गीकरण प्रकार B (३५ वर्षे पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे)

- लेखापरिक्षण अहवाल,
- पोटनियम दुरूस्ती प्रकरणे,
- कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तिका
- पेन्शन प्रकरणे
- वेतन देयके (Cash Book)
- जी. डी. सी. ए. निकाल पत्र
- विभागीय परिक्षा निकाल पत्र
- नियुक्ती आदेश
- बदली आदेश
- बढती आदेश
- आरक्षण आदेश

वर्गीकरण प्रकार C (५ वर्षा पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे)

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- शासन राजपत्र व अधिसूचना
- विधान सभा प्रश्न व उत्तरे / विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासने
- प्रशासकीय आदेश
- कामकाज वाटप आदेश
- तपासणी अहवाल
- आवक जावक नोंदवही
- PRA / PRB (नियतकालीन विवरण पत्रे सादरीकरण नोंदवही)

७. **The particulars of any arrangement that exists for consultation with, or representation by, the members of the public in relation to the formulation of its policy or administration, thereof**

**(आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशील)**

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायद्यातील दुरूस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

८. **A statement of the boards, councils and other bodies – Minutes**

**( आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण )**

सुधारित कायदयाप्रमाणे कलम ८१ अधिन तरतुदीप्रमाणे सर्व सहकारी संस्था त्यांचे आर्थिक लेख्यांचे प्रतिवर्षी लेखापरीक्षण करवून घेणेसाठी वार्षिक साधारण सभेमध्ये लेखापरीक्षकांच्या नामिकेवरील पात्र लेखापरीक्षकाची नेमणूक करेल, जेथे अशी नेमणूक होणार नाही त्या स्थितीमध्ये संस्थेचा निबंधक परंतुकाचे आदेशाने लेखापरीक्षकाची नेमणूक करून प्रत्येक संस्थेची लेखापरीक्षा करवून घेईल.

## ९. A directory of officers and employees (अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका )

### मुख्यालयातील कार्यरत अधिकारी

### सहकार आयुक्त कार्यालयातील गट-अ व गट-ब संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांचा तपशील (दि.०८/०१/२०२५ अखेर)

| अ.क्र | कार्यरत अधिकारी संख्या | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|---|
| मा.सहकार आयुक्त | | | |
| १ | १ | मा.श्री.दिपक तावरे (भा.प्र.से.) | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूर पदे -०१, भरलेली पदे-०० व रिक्त पदे-०१. | | | |
| २ | ० | **रिक्त पद** | अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूर पदे -०३, भरलेली पदे-०३ व रिक्त पदे-००. | | | |
| ३ | १ | श्री.श्रीकृष्ण वाडेकर | अपर निबंधक सहकारी संस्था (पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ४ | २ | श्री.मिलिंद आकरे | अपर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूका) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ५ | ३ | श्री.राजेश सुरवसे | अपर निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) मुख्यालय, पुणे |
| उपनिबंधक, सहकारी संस्था, गट-अ मंजूर पदे -११, भरलेली पदे-०९ व रिक्त पदे- ०२. | | | |
| ६ | १ | श्री.आनंद कटके | उपनिबंधक सहकारी संस्था, नागरी बँका, मुख्यालय, पुणे |
| ७ | २ | **रिक्त पद** | उपनिबंधक सहकारी संस्था, सर्वसाधारण कार्यासन, मुख्यालय, पुणे |
| ८ | ३ | श्री.मिलिंद सोबले | उपनिबंधक, सहकारी संस्था, नागरी पतसंस्था शाखा मुख्यालय, पुणे |
| ९ | ४ | **रिक्त पद** | उपनिबंधक, सहकारी संस्था, आस्थापना शाखा, मुख्यालय, पुणे |
| १० | ५ | श्री.प्रशांत सुर्यवंशी | उपनिबंधक सहकारी संस्था, अंदाज व नियोजन शाखा, मुख्यालय, पुणे |
| ११ | ६ | श्री.सिध्दार्थ गायकवाड | उपनिबंधक सहकारी संस्था, औद्योगीक/ मजूर/जंगल कामगार/ पदुम संस्था/निवडणूक कार्यासन), (इतर सर्वसाधारण संस्था कार्यासन), मुख्यालय, पुणे |
| १२ | ७ | श्रीमती साधना देशमुख | उपनिबंधक, सहकारी संस्था, सावकारी शाखा/भुविकास व पाणीपुरवठा शाखा, दक्षता शाखा, मुख्यालय, पुणे |
| १३ | ८ | श्रीमती देवयानी भारस्वाडकर | उपनिबंधक, सहकारी संस्था, केंद्रीय योजना अंमलबजावणी समन्वय कक्ष, मुख्यालय, पुणे |
| १४ | ९ | श्री.किरण सोनवणे | उपनिबंधक सहकारी संस्था, कायदा व वैधानिक कार्यवाही व गृहनिर्माण शाखा, मुख्यालय, पुणे |
| १५ | १० | श्री.महेंद्र भा.मगर | उपनिबंधक, सहकारी संस्था, परिक्षा व प्रशिक्षण / माहिती व तंत्रज्ञान शाखा / मा.सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे |
| १६ | ११ | श्री.एम.एल.माळी | उपनिबंधक, सहकारी संस्था, विकास संस्था शाखा आणि त्रिस्तरीय कृषि पतपुरवठा शाखा, मुख्यालय, पुणे |
| सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब मंजूर पदे -१३, भरलेली पदे- ०९ व रिक्त पदे-०४ | | | |
| १७ | १ | श्रीमती स्मिता मधुकर पाचोरे | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (आस्थापना-२) मुख्यालय, पुणे |
| १८ | २ | **रिक्त पद** | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (आस्थापना-१) मुख्यालय, पुणे |
| १९ | ३ | श्री. गणेश कौटे | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (नागरी पतसंस्था) मुख्यालय, |

| अ.क्र | कार्यरत अधिकारी संख्या | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|---|
| | | | पुणे |
| २० | ४ | श्री.रविंद्र पत्रिमठ | सहायक निबंधक, सहकारी संस्था, औद्योगीक/मजूर/जंगल कामगार/पदुम संस्था/निवडणूका/इतर सर्वसाधारण सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे |
| २१ | ५ | श्रीमती सुनंदा जाधव | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षता/तक्रार निवारण, मुख्यालय, पुणे |
| २२ | ६ | **रिक्त पद** | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था परिक्षा व प्रशिक्षण, मुख्यालय, पुणे |
| २३ | ७ | श्री. सतिश ढमाळ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (नागरी बँक) मुख्यालय, पुणे |
| २४ | ८ | **रिक्त पद** | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (अंदाज व नियोजन) मुख्यालय, पुणे |
| २५ | ९ | श्री.एस.व्ही.जगताप | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, (विकास संस्था शाखा आणि त्रिस्तरीय कृषी पतपुरवठा शाखा) मुख्यालय, पुणे |
| २६ | १० | श्री.नितीन शाहू मस्के | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (सावकारी शाखा आणि भुविकास व पाणीपुरवठा शाखा) मुख्यालय, पुणे |
| २७ | ११ | श्री.दिलीप सोनवणे | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (कायदा व वैधानिक कार्यवाही) मुख्यालय, पुणे |
| २८ | १२ | श्री.नवनाथ अरुण अनपट | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सर्वसाधारण शाखा, मुख्यालय, पुणे |
| २९ | १३ | **रिक्त पद** | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (गृहनिर्माण) मुख्यालय, पुणे |
| अपर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूर पदे -१, भरलेली पदे- ० व रिक्त पदे-०१ | | | |
| ३० | १ | **रिक्त पद** | अपर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| सह निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूर पदे -१, भरलेली पदे- १ व रिक्त पदे-०० | | | |
| ३१ | १ | श्री.आर.यु.जाधवर | सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप) मुख्यालय, पुणे |
| **विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१** | | | |
| ३२ | १ | श्री.एस.के. वुईके | विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ (लेप नागरी बँका) मुख्यालय, पुणे |
| ३३ | २ | *श्री.आर.बी.जंगले* | विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ (लेप पतसंस्था व कर्जमाफी), मुख्यालय, पुणे |
| **विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-२** | | | |
| ३४ | १ | श्री.विवेक शामराव जाधव | विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-२, मुख्यालय, पुणे |
| ३५ | २ | श्री.मारुती खामकर | विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-२, मुख्यालय, पुणे |
| लेखा शाखा व सांख्यिकी शाखा | | | |
| ३६ | १ | श्रीमती वसुंधरा मुकुंद सोबले | सहाय्यक संचालक (लेखा) वर्ग-१ |
| ३७ | २ | श्रीमती गिता टिंगरे | लेखाधिकारी वर्ग-२ |
| ३८ | ३ | रिक्त पद | संख्याशास्त्रज्ञ, वर्ग-१ मुख्यालय, पुणे |
| ३९ | ४ | श्रीमती तारकेश्वरी म.बोरीगिड्डे | सहाय्यक संख्याशास्त्रज्ञ (सांखिकी) वर्ग-२, मुख्यालय, पुणे |

## सहकार आयुक्त कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक
## कार्यालय PBX-(०२०)-२६१२२८४६

| अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यालय | Inter Com | Br. Inter. |
|---|---|---|---|
| **मा. दिपक तावरे,** भा.प्र.से<br>**सहकार आयुक्त** | 26122500<br>26122739 | 301<br>304 | --<br>-- |
| **श्री. महेंद्र मगर**<br>आयुक्तांचे खाजगी सचिव | 26122500<br>26122739 | 212<br>214 | |
| **श्री. अरविंद गोरे**<br>आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | 26122500<br>26122739 | 213<br>302 | |
| **श्री. अनिल कवडे,** भा.प्र.से. (से.नि.)<br>आयुक्त राज्य सह.निवडणूक प्राधिकरण | 26051177<br>26050641 | - | -- |
| **श्री. ए.व्ही. गाडे,** सचिव, राज्य सह.निवडणूक प्राधिकरण | | | |
| **श्री. विकास रसाळ**<br>पणन संचालक | 26123985<br>26126628 | - | |
| **श्री. श्रीकृष्ण वाडेकर**<br>**प्र. अपर आयुक्त व विशेष निबंधक**<br>( जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँक/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, /सावकारी व भूविकास/उपसा व जलसिंचन/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संगणकीकरण) | 26145778 | 203<br>272 | |
| **श्री. श्रीकृष्ण वाडेकर**<br>**अपर निबंधक सहकारी संस्था (पतसंस्था)**<br>(पतसंस्था/लेखा/संवका/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, भुविकास/ उपसा व जलसिंचन) तथा | 26128979 | 210<br>211 | -- |
| **श्री. मिलींद आकरे**<br>**अपर निबंधक (तपासणी व निवडणूका)**<br>नागरी बँका/ माहिती व तंत्रज्ञान कक्ष- E-Governance /अंदाज व नियोजन/ इतर संस्था : (औद्योगिक, मजुर, जंगल कामगार, पदुम व निवडणुक), सर्वसाधारण संस्था (पतसंस्था वगळून), सांख्यिकी | 26127261 | 268<br>209 | |
| **श्री. राजेशकुमार सुरवसे,**<br>**अपर निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)**<br>(आस्थापना/परिक्षा व प्रशिक्षण/दक्षता व तक्रार निवारण, कायदा व वैधानिक कार्यवाही/केंद्र पुरस्कृत योजना/गृहनिर्माण ) | 26129572 | 204<br>205 | -- |
| **श्री. राजेश जाधवर**<br>**प्र. अपर निबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण)**<br>(लेखापरिक्षण नागरी बँका व शिखर संस्था),<br>(लेखाजि.म.स. बँक/ पतसंस्था/इतर संस्था कर्जमाफी) | | | |
| **श्री. राजेश जाधवर,** सहनिबंधक (लेखापरीक्षण) | | 256 | 258 |
| **श्री. मिलींद सोबले,** उपनिबंधक (आस्थापना) | 26129321 | 220 | 222 |
| **प्र. श्रीमती स्मिता पाचोरे,** सहाय्यक निबंधक (आस्थापना-1) | | 221 | 222 |
| **श्रीमती स्मिता पाचोरे,** सहाय्यक निबंधक (आस्थापना-2) | | 265 | 222 |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र. श्रीमती सुनंदा जाधव,**<br>सहाय्यक निबंधक (परिक्षा व प्रशिक्षण) | | 183 | 225 |
| **श्रीमती साधना देशमुख,** उपनिबंधक, (दक्षता/तक्रार निवारण) | | 191 | 228 |
| **श्रीमती सुनंदा जाधव,**<br>सहाय्यक निबंधक (दक्षता/ तक्रार निवारण) | | 227 | 228 |
| **श्री. एम. एल. माळी,** उपनिबंधक<br>विकास संस्था शाखा आणि त्रिस्तरीय कृषि पतपुरवठा शाखा. | 29982841 | 218 | 219 |
| **श्री. जगताप,** सहाय्यक निबंधक, कृषीपत | | | |
| **श्रीमती साधना देशमुख**<br>उपनिबंधक सावकारी शाखा आणि भुविकास व उजसिं/ पाणीपुरवठा शाखा | | 230 | 230 |
| **श्री. एन. एस. मस्के,** सहाय्यक निबंधक (सा.व.भू.) | | | |
| **श्री. किरण सोनवणे**, उपनिबंधक – गृहनिर्माण | -- | 240 | 241 |
| **प्र. श्री. नवनाथ अनपट,** सहाय्यक निबंधक (गृहनिर्माण ) | -- | 170 | 241 |
| **श्री. प्रशांत सुर्यवंशी,** उपनिबंधक (अंदाज व नियोजन) | | 261 | 263 |
| **श्रीमती पी. पी. किर्वे,** सहाय्यक निबंधक, (अं व नि.) | | 262 | 263 |
| **श्री. मिलींद सोबले (प्र)** उपनिबंधक ( पतसंस्था) | | 232 | 233 |
| **श्री. गणेश कौटे**, सहाय्यक निबंधक ( पतसंस्था) | | 231 | 233 |
| **श्री. आनंद कटके,** प्र. उपनिबंधक (सर्वसाधारण/इतर संस्था) | | 236 | 177 |
| **श्री. नवनाथ अनपट**, सहाय्यक निबंधक (सर्वसाधारण) | | 235 | 177 |
| **प्र. श्री. प्रशांत सुर्यवंशी,** उपनिबंधक<br>**(E-Gov.) (**औद्योगिक**,** मजूर**,** जंगल व निवडणूक**)** | | 245 | 177 |
| **श्री. रविंद्र पत्रिमठ,**<br>सहाय्यक निबंधक (औद्योगिक/ मजूर/ जंगल कामगार/ पदुम संस्था/ निवडणूका/ इतर सर्वसाधारण सहकारी संस्था) | | 245 | - |
| **श्रीमती ऐश्वर्या महेश गोडसे,** सहाय्यक निबंधक (औद्योगिक) | | 177 | - |
| **श्री. आनंद कटके,** उपनिबंधक (नागरी बॅंक) | | 247 | 171 |
| **श्री. सतिश ढमाळ,** सहाय्यक निबंधक (नागरी बॅंक) | | 248 | 171 |
| **श्री. किरण सोनवणे**<br>उपनिबंधक (कायदा व वैधानिक कार्यवाही) L & S | | 238<br>239 | 277 |
| **श्री. दिलीप सोनवणे,** सहाय्यक निबंधक, कायदा<br>सहाय्यक निबंधक (कायदा व वैधानिक कार्यवाही ) | | 239 | 239 |
| **श्रीमती देवयानी भारस्वाडकर,**<br>उपनिबंधक, केंद्रीय योजना समन्वय कक्ष | | 186 | 185 |
| **श्री. दिलीप सोनवणे,** सहाय्यक निबंधक, कायदा<br>प्र. सहाय्यक निबंधक (केंद्रीय योजना समन्वय कक्ष) | | 239 | 239 |
| **श्रीमती वसुंधरा सोबले,** सहाय्यक संचालक लेखा - वर्ग 1 | | 242 | 244 |
| **श्रीमती गिता टिंगरे**, लेखाधिकारी | | 243 | 244 |
| **श्री. रावसाहेब जंगले,** (विलेप वर्ग-1)<br>लेखापरिक्षण (जि.म.स. बॅंक/पतसंस्था/इतर संस्था कर्जमाफी) | | 275 | 251 |
| **श्री. सदानंद वुईके,** विलेप वर्ग-1 लेखापरीक्षण<br>(नागरी बॅंक व शिखर संस्था) | | 257 | 251 |
| **श्री. विवेक जाधव** (विलेप वर्ग- 2) | | 255 | |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र. श्री. राजेंद्र पवार** (विलेप वर्ग- 2) | | 254 | |
| **श्री. चंद्रशेखर पावसे,** (प्र) संख्याशास्त्रज्ञ | | 249 | 251 |
| **श्रीमती बोरीगिड्डे,** सहाय्यक संख्या शास्त्रज्ञ | | 250 | 251 |

**१०. The monthly remuneration received by each of officers and employees, including the system of compensation as provided in regulations**

**(आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राथिकरणाच्या विनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती )**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील पदांचा तपशिल व वेतनबँन्ड व ग्रेड पे चा तक्ता

**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था म.रा.पुणे यांचे अधिनस्त कार्यालयातील एकूण पदांचा तपशील (प्रशासन विभाग)**

| अ.क्र. | पदनाम (गट) | वेतन संरचना /श्रेणी Scale of Pay | पदांची संख्या No.of Posts | Designation |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सहकार आयुक्त व निबंधक, सह. संस्था | संवर्ग पद | १ | Commissioner for Co-operation and Registrar of Co-operative Societies |
| २ | साखर आयुक्त | संवर्ग पद | १ | Commissioner of Sugar |
| ३ | आयुक्त, वस्त्रोद्योग | संवर्ग पद | १ | Commissioner of Handloolms Powerlooms Textiles |
| ४ | पणन संचालक | S-२८: १२४८००-२१२४०० | १ | Diretcotor of Marketing |
| ५ | अपर आयुक्त व विशेष निबंधक | S-२८: १२४८००-२१२४०० | १ | Additional Commissioner and Special Registrar of Coop societies |
| ६ | अपर निबंधक | S-२७: ११८५००-२१४१०० | ५ | Additonal Registrar of Cooperative Societies |
| ७ | सहनिबंधक (प्रशा) | S-२३: | २८ | Joint Registaar of |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ६७७००-२०८७०० | | Cooperative Societies |
| ८ | उप निबंधक (प्रशा) | S-२०: ५६१००-१७७५०० | १३३ | Deputy Registrar of Co-Op. Socities |
| ९ | सहाय्यक संचालक (लेखा) | S-२०: ५६१००-१७७५०० | १ | Assistance director of Accounts |
| १० | संख्या शास्त्रज्ञ | S-२०: ५६१००-१७७५०० | २ | Statistitcian |
| ११ | कार्यकारी अभियंता | S-२३: ६७७००-२०८७०० | १ | Executive Engineer |
| १२ | उप अभियंता | S-१५: ४१८००-१३२३०० | १ | Deputy Engineer |
| १३ | न्यायाधीश | S-२०: ५६१००-१७७५०० | ० | Judge Co-Operative Court |
| १४ | अध्यक्ष (अपील न्यायालय) | | ० | President Appellate Court |
| १५ | सदस्य (अपील न्यायालय) | pay in judicary service | ० | Member Appellate Court |
| १६ | उपसंचालक सांख्यिकी | pay in judicary service | **१** | Member Appellate Court |
| | **एकूण गट-अ** | | **१७६** | |
| १७ | सहाय्यक निबंधक | S-१५: ४१८००-१३२३०० | ४४९ | Assistance Registrar of Co-operative Societies |
| १८ | सहाय्यक संख्याशास्त्रज्ञ | S-१५: ४१८००-१३२३०० | १ | Assistance Statistitcian |
| १९ | सहाय्यक संचालक (कृ)साखर | S-१५: ४१८००-१३२३०० | २ | Assistance Director (Agriculture) |
| २० | लेखाधिकारी गट-ब | S-१६: ४४९००- | ३ | Account Officer |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १४२४०० | | | |
| २१ | सहायक लेखाधिकारी गट-ब | | ० | **Account Officer** | |
| **एकूण गट-ब** | | | **४५५** | **०** | |
| २२ | लघुलेखक उच्चश्रेणी | S-१५: ४१८००-१३२३०० | १५ | **Stenographer (Higher Grade)** | |
| २३ | कार्यालय अधिक्षक | S-१४: ३८६००-१२२८०० | ११६ | **Office Supridendent** | |
| २४ | सहकार अधिकारी श्रेणी-1 | S-१४: ३८६००-१२२८०० | ३५८ | **Co-operative Officer-Grade-I** | |
| २५ | लघुलेखक निम्नश्रेणी | S-१३: ३५४००-११२४०० | ६६ | **Stenographer (Lower Grade)** | |
| २६ | लेखापाल वरिष्ठ श्रेणी | S-१३: ३५४००-११२४०० | ३८ | **Accountant (Higher Grade)** | |
| २७ | मुख्य लिपीक | S-१३: ३५४००-११२४०० | ४७८ | **Head Clerk** | |
| २८ | सहकार अधिकारी श्रेणी-2 | S-१३: ३५४००-११२४०० | ४४३ | **Co-operative Officer-Grade-II** | |
| २९ | प्रतवारी पर्यवेक्षक | S-१३: ३५४००-११२४०० | १९ | **Grading Superviser** | |
| ३० | प्रतवारी निरीक्षक | S-१३: ३५४००-११२४०० | ६ | **Grading Inspector** | |
| ३१ | शिरस्तेदार | S-१३: ३५४००-११२४०० | ० | **Bench Clerk** | |
| ३२ | विभागीय मूल्यनिरीक्षक | S-१३: ३५४००-११२४०० | ५ | **Divisional Prise Inspector** | |
| ३३ | कनिष्ठ अभियंता | S-१३: ३५४००-११२४०१ | ० | **Junior Engineer** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | वरिष्ठ लिपीक | S-८: २५५००-८११०० | ३२२ | **Senior Clerk** | |
| ३५ | सहाय्यक सहकार अधिकारी | S-८: २५५००-८११०० | ५२१ | **Assistance Co-operative Officer** | |
| ३६ | सांख्यिकी निरीक्षक | S-८: २५५००-८११०० | ८ | **Statistical Inspector** | |
| ३७ | साख्यिकी सहाय्यक | S-८: २५५००-८११०० | २५ | **Statisticial Assistance** | |
| ३८ | लेखापाल कनिष्ठ श्रेणी | S-८: २५५००-८११०० | २ | **Accountant Lower Grade** | |
| ३९ | लघुटंकलेखक | S-६: १९९००-६३२०० | १३ | **Steno Typist** | |
| ४० | वरिष्ठ पर्यवेक्षक/हातमाग वस्त्रनिर्माण निरीक्षक | S-८: २५५००-८११०० | १४ | **Testile Inspector** | |
| ४१ | कनिष्ठ लिपीक | S-६: १९९००-६३२०० | ८६० | **Junior Cletk** | |
| ४२ | हातमाग पर्यवेक्षक | S-१३: ३५४००-११२४०० | १७ | **Handlooms Supervisor** | |
| ४३ | प्रयोगशाळा सहाय्यक | S-६: १९९००-६३२०० | ८ | **Laborotary Assistant** | |
| ४४ | कनिष्ठ पर्यवेक्षक | S-६: १९९००-६३२०० | १५ | **Junior Supervisor** | |
| ४५ | प्रतवारीकार | S-६: १९९००-६३२०० | ८७ | **Grader** | |
| ४६ | यंत्रमागदेशक | S-१०: २९२००-९२३०० | ८ | **Powerloom Jobber** | |
| ४७ | वाहनचालक | S-१०: २९२००-९२३०१ | ७५ | **Driver** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४८ | संशोधन सहायक | S-६: १९९००-६३२०० | २ | |
| | **एकूण गट-क** | | **३५१९** | |
| ४९ | प्रयोगशाळा परिचर | S-१: १५०००-४७६०० | २ | **Laboratory Attendent** |
| ५० | नाईक/हवालदार | S-३: १६६००-५२४०० | ४४ | **Naik/ Hawaldar** |
| ५१ | दप्तरबंद | S-३: १६६००-५२४०० | ३ | **Dafterband** |
| ५२ | रोनिओ ऑपरेटर | S-३: १६६००-५२४०० | २ | **Ronio Operator** |
| ५३ | झेरॉक्स ऑपरेटर | S-३: १६६००-५२४०० | ३ | **Xerox Operator** |
| ५४ | शिपाई | S-१: १५०००-४७६०० | ५६१ | **Peon** |
| ५५ | प्रतवारी परिचर | S-१: १५०००-४७६०० | ३३ | **Grading Attendent** |
| ५६ | पहारेकरी | S-१: १५०००-४७६०० | २ | **Watchman** |
| | **एकूण गट-ड** | | **६५०** | |
| | **एकुण एंकदर वर्ग-१+२+३+४** | | **४८००** | |
| | | | | |

मु.ले.शि.२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण २२३५१७८२ ठेव संलग्न विमा योजनेनुसार प्रदाने या योजनेअंतर्गत **दिनांक ०१.०७.२०२४ ते ३१.१२.२०२४** या कालावधीत लाभ प्रदान करण्यात आलेल्या दिवंगत कर्मचाऱ्यांची यादी -

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | दिवंगत कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | वारसाचे नाव व दिवंगत कर्मचाऱ्याशी नाते | मंजुर आदेश क्रमांक व दिनांक | मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - **निरंक** * - | | | | | |
| * सदरहू लेखाशिर्षातर्गत शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसल्याने उक्त कालावधीत लाभ प्रदान करण्यात आलेला नाही. | | | | | |

**१२.**

| **अ. क्र.** | **शासन निर्णयानुसार दिलेले विषय** | **शासन निर्णय क्रमांक व दिनांक** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|
| १ | २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>भविष्य निर्वाह निधीच्या वर्गनिदारांसाठी ठेव संलग्न विमा योजनेमध्ये सुधारणा | १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.भनिनि-१००३/प्र.क्र.४४/२००३/१३-अ, दिनांक १.१२.२००३<br>२) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र. भनिनि-१०१२/ २५/ प्र.क्र.१३३/१२/१३-अ, दिनांक १५.१.२०१३ | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था व अधिनस्त असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मयत झाल्यास त्यांच्या वारसांना सदरहू योजनेअंतर्गत रु.६०,०००/- इतक्या रकमेचा लाभ प्रदान करण्यात येतो. |
| २ | महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१७ निधी वितरण | शा.नि.क्र.लेखानु-२०१७ / प्र.क्र.२४ /२०१७ / १७-स,दिनांक १०.४.२०१७ व दि.१९.४.२०१७ | -- |
| ३ | कार्यक्रम अंदाजपत्रक २०२५-२६ तयार करणे व मुद्रण करण्याबाबत | वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक काअंप-२०२४ / प्र.क्र.२६/अर्थसंकल्प-१, दिनांक १४.१०.२०२४ | प्रतिवर्षी विधानमंडळाच्या मार्चमध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास कार्यक्रम अंदाजपत्रके अर्थसंकल्प विधानमंडळास सादर झाल्यानंतर त्याच दिवशी विधानमंडळ सदस्यांना उपलब्ध करुन द्यावयाची असतात. |
| ४ | ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे<br>अ)घरबांधणी अग्रिम : सुधारीत वेतनबँड मधील वेतन विचारात घेऊन अग्रिमाच्या रकमेत तसेच घरांच्या किंमत मर्यादेत सुधारणा करणेबाबत | १) शासन निर्णय क्रमांक घबांअ-१०११/प्र.क्र.५६/ २०११/ विनियम, दिनांक २७.२.२०१२<br>२) वित्त विभाग शासन निर्णय क्र.घबांअ-२०१२/ प्र.क्र.३०/ २०१२/विनियम/ दिनांक २०.२.२०१५<br>३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/ प्र.क्र.१४/ २०१९/विनियम/ दिनांक ०२.०२.२०२१<br>**४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/ प्र.क्र.३१/ २०२३/विनियम, दिनांक ०१.०३.२०२४** | घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सातव्या वेतन आयोगानूसार मुळ वेतन विचारात घेऊन प्रचलित शासन निर्णय व मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील तरतुदीनूसार अग्रिम अदा केले जाते. |
| | ब) मोटार सायकल, स्कुटर,मोपेड, सायकल व | १) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अग्रिम २०१३/ प्र.क्र.१०/२०२२ / विनियम, दिनांक | राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातत्वया वेतन आयोगानुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| | अपंग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलीत किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर करावयाच्या अग्रिमाबाबत | २०.०८.२०१४<br>**२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अग्रिम २०२२/ प्र.क्र.३३/२०२२ / विनियम, दिनांक ०९.११.२०२३** | मोटार सायकल, स्कुटर,मोपेड, सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलीत किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी प्रचलित शासन निर्णयानुसार अग्रिम अदा केले जाते. |
| | क) राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजुर करण्याबाबत | १) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अग्रिम २०११/ प्र.क्र.५७/२०११ / विनियम, दिनांक १७.०२.२०१२<br>**२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अग्रिम २०२२/ प्र.क्र.३२/२०२२ / विनियम, दिनांक १७.१०.२०२३** | राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना मोटार कार खरेदी करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयानुसार अग्रिम अदा केले जाते. |
| | ड) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना वैयक्तिक संगणक / लॅपटॉप/टॅबलेट संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजुर करणेबाबत | वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अग्रिम१०११/प्र.क्र.५०/२०११ / विनियम,दिनांक ०३.२.२०१२ | शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना वैयक्तिक संगणक / लॅपटॉप/टॅबलेट संगणक खरेदी करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयानुसार अग्रिम अदा केले जाते. |

## सन 2024-25 चे अंतिम सुधारीत अनुदान याबाबतचे स्पष्टीकरण विवरणपत्र
## कार्यक्रम खर्च (PLAN) मागणी क्रमांक व्ही-2

(रुपये हजारात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन 2024-25 साठी मूळ अर्थसंकल्पित तरतुद | दि.31.12.2024 अखेर बी.डी.एस. वर प्राप्त तरतुद | बी.डी.एस. वरील खर्च दि.31.12.2024 अखेर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | राज्य सहकारी संघ (24250218) (कार्यक्रम) | 9000.000 | 0.000 | 0.000 |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (कार्यक्रम ) (24251009) | 3000000.000 | 1350000.000 | 1270598.913 |
| 3 | अल्पमुदत सकारी पतसंरचनेअंतर्गत राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सक्षमीकरणासाठी सहाय्य (कार्यक्रम) (24252524) | 5346105.000 | 2000000.000 | 2000000.000 |
| 4 | शेतक-यांना अल्पमुदती पीक कर्जपुरवठा करण्यासाठी 1 टक्का व्याजदराने अर्थसहाय (कार्यक्रम) (24251501) | 3162800.000 | 600000.000 | 588769.366 |
| 5 | अवेळी पाऊस व गारपीट आपदग्रस्त शेतक-यांना कर्जावरील व्याजमाफी (कार्यक्रम) (24252453) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 6 | परवानाधारक सावकाराकडून शेतक-यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड (कार्यक्रम) (24252444) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 7 | उपसा  जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य (कार्यक्रम) (24251261) | 100000.000 | 0.000 | 0.000 |
| 8 | रुपातंरीत कर्जावरील व्याजमाफी (कार्यक्रम) (24252506) | 27622.000 | 27621.333 | 0.000 |
| 9 | राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचनेअंतर्गत प्राथमिक कृषीपतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरणासाठी सहाय्य (कार्यक्रम) (24252515) | 300000.000 | 180000.000 | 28985.260 |
| 10 | केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण, केंद्र हिस्सा -60% (कार्यक्रम) | 645500.000 | 336450.000 | 336450.000 |
| 11 | केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण, राज्य हिस्सा -40% (कार्यक्रम) | 433667.000 | 224300.000 | 224300.000 |
| 12 | महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 (राज्यस्तर) (कार्यक्रम) (24350142) | 1.000 | 0.000 | 0.000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना (24350189) (राज्यस्तर) (कार्यक्रम) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 14 | नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना कर्जमाफी (राज्यस्तर) (कार्यक्रम) (24350133) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 15 | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना 2017 (कार्यक्रम) (24350082) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| | | 1.000 | 0.000 | 0.000 |
| | | 1.000 | 0.000 | 0.000 |
| | | 1.000 | 0.000 | 0.000 |
| | | 1.000 | 0.000 | 0.000 |
| | | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 16 | जिल्हा मध्ययवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदान (44250768) | 1.000 | 0.000 | 0.000 |
| 17 | उत्खनन (अर्थमुव्हर्स) यंत्रसामग्री व्याज अर्थसहाय्य योजना (कार्यक्रम) (2402A237) | 0.000 | 0.000 | 0.000 |
| | **एकूण** | 13024706.000 | 4718371.333 | 4449103.539 |

## ११. The budget allocated to each of its agency, indicating the particulars of all plans, proposed expenditures and reports on disbursements made

**( सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेला रकमांचा अहवाल )**

**सन 2023-24 चे अंतिम सुधारीत अनुदान याबाबतचे स्पष्टीकरण विवरणपत्र**

**कार्यक्रम खर्च (PLAN) मागणी क्रमांक व्ही-2**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन 2024-25 साठी मूळ अर्थसंकल्पित तरतुद | दि. 31.12.2024 अखेर बी.डी.एस. वर प्राप्त तरतुद | बी.डी.एस. वरील खर्च दि. 31.12.2024 अखेर |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (कार्यक्रम ) (24251009) | 300.00 | 135.00 | 127.00 |
| 2 | अल्पमुदत सकारी पतसंरचनेअंतर्गत राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सक्षमीकरणासाठी सहाय्य (कार्यक्रम) (24252524) | 534.61 | 200.00 | 200.00 |
| 3 | शेतक-यांना अल्पमुदती पीक कर्जपुरवठा करण्यासाठी 1 टक्का व्याजदराने अर्थसहाय (कार्यक्रम) (24251501) | 316.28 | 60.00 | 59.00 |
| 4 | अवेळी पाऊस व गारपीट आपदग्रस्त शेतक-यांना कर्जावरील व्याजमाफी (कार्यक्रम) (24252453) | 0.01 | 0 | 0 |
| 7 | रुपातंरीत कर्जावरील व्याजमाफी (कार्यक्रम) (24252506) | 2.76 | 0 | 0 |
| 8 | राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचनेअंतर्गत प्राथमिक कृषीपतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरणासाठी सहाय्य (कार्यक्रम) (24252515) | 30.00 | 18.00 | 2.90 |
| 9 | महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 (राज्यस्तर) (कार्यक्रम) (24350142) | 0.01 | 0 | 0 |
| 10 | नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना कर्जमाफी (राज्यस्तर) (कार्यक्रम) (24350133) | 0.01 | 0 | 0 |
| 11 | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना 2017 (कार्यक्रम) (24350082) | 0.01 | 0 | 0 |
| 12 | महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना (राज्यस्तर) (24350189) | 0.01 | 0.00 | 0.000 |
| 13 | जिल्हा मध्ययवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदान (44250768) | 0.01 | 0.00 | 0.000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण राज्य हिस्सा (40 %) (2425 2589) | 43.36 | 22.43 | 22.43 |
| 15 | केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण केंद्र हिस्सा (60 %) (2425 2571) | 64.55 | 33.64 | 33.64 |

## १३.Particulars of receipts of concessions, permits or authorisations granted by it

## (ज्या व्यक्तिंना सवलती, परवाने व प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तिंचा तपशील )

**छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना**-2017

- शासन निर्णय दिनांक 28/06/2017 अन्वये शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना 2017 ही कर्जमाफी/अर्थसहाय्य योजना अंमलात आणलीआहे.
- सदर योजनेअंतर्गत काही अटी- शर्थीच्या आधारावर रु. 1.50 लाखापर्यत कर्जमाफी, रु. 1.50 लाखावरील रक्कम संबंधित शेतक-यांने भरण्याच्या अटीवर एकवेळ समझोता योजना व प्रोत्साहन 2015-16 व सन 2016-17 मध्ये नियमित पीक कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांना किमान रु. 15000/- व कमाल रु. 25000/- पर्यत प्रोत्साहनात्मक लाभ असे तीन घटक समाविष्ठ आहेत.
- सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतक-यांकडूनऑनलाईनअर्जसादर करण्यात आले. त्यानुसार 58 लाख शेतक-यांनी सादर केलेल्या अर्जामध्ये 78.35 लाख कर्ज खाती समाविष्ठ आहेत.
- सदर योजनेसाठीएकूण रु.20094.06 कोटी खर्च करण्यात आला आहे. सदर योजनेतंर्गत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जमाफी, एकवेळ समझोता व प्रोत्साहनपर लाभाचा तपशिल योजना संगणकीय प्रणालीनुसार पुढीलप्रमाणे आहे. (हरित यादी क्र. 1 ते 23, दिनांक 18.09.2019 अखेर)

| अ.क्र. | तपशिल | कर्जमाफी | | एकवेळ समझोता कर्जमाफी | | प्रोत्साहनपर अनुदान | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जखाती संख्या (लाख) | रक्कम रुपये कोटी | कर्जखाती संख्या (लाख) | रक्कम रुपये कोटी | कर्जखाती संख्या (लाख) | रक्कम रुपये कोटी | कर्जखाती संख्या (लाख) | रक्कम रुपये कोटी |
| 1 | मंजूर | 26.17 | 15349 | 7.21 | 6615 | 17.22 | 2773 | 50.60 | 24737 |
| 2 | वितरीत | 24.88 | 13705 | 4.27 | 2630 | 14.89 | 2427 | 44.04 | 18762 |
| 3 | शिल्लक | 1.29 | 1644 | 2.94 | 3985 | 2.33 | 346 | 6.56 | 5975 |

- मा. मंत्री, सहकार यांचे अध्यक्षतेखालील दि. 08/11/2023 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर योजनेची अंमलबजावणी व तांत्रिक अडचणीबाबत महा-आयटी यांनी तीन महिन्यात सहकार विभागास माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार महा-आयटी यांचेकडून दि. 04/12/2023 रोजीच्या पत्राद्वारे शासनास अहवाल देऊन तांत्रिक अडचणीचा तपशील कळविण्यात आला आहे.
- मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील दि. 27/03/2024 रोजी बैठक घेण्यात आली होती. या बैठकीसाठी मा. अप्पर मुख्य सचिव (सहकार व पणन), मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, व्यवस्थापकीय संचालक, महा-आयटी व अन्य अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी सन 2023-24 च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली. या चर्चेमध्ये योजना अंमलबजावणीसाठी नवीन संगणकीय प्रणाली

विकसित न करता महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-2019 या योजनेसाठी कार्यरत असलेल्या संगणकीय प्रणालीचा वापर करण्याबाबत चर्चा झाली. त्याचप्रमाणे महा-आयटी यांनी योजनेतंर्गत 1 ते 23 हरित याद्यामधील पात्र शेतक-यांच्या माहितीनुसार आवश्यक कार्यवाही करुन लाभार्थ्यांच्या याद्या तयार करण्याबाबत महा-आयटी यांना सूचित करण्यात आले.

- मा. मंत्री, सहकार यांच्या अध्यक्षतेखाली दि. 17/06/2024 रोजी साखर संकुल पुणे येथे झालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या बैठकीमध्ये सदर योजनेतंर्गत पात्र व प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या संकलित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांचेकडून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती व राज्यस्तरीय बँकर्स समितीकडून व्यापारी बँकांची माहिती प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना**-2019

- शासन निर्णय दि.27/12/2019 अन्वये योजना कार्यान्वित.
- योजनेतंर्गत पात्र कर्जे :- पीक कर्ज व पुनर्गठित/फेरपुनर्गठित पीक कर्जाची रुपये दोन लाखापर्यतची थकबाकी.
- योजनेतंर्गत पात्र कर्जाचा कालावधी :-दि. 01/04/2015 ते 31/03/2019 या कालावधीत वितरति व दि. 30/09/2019 रोजी थकित असलेली पीक कर्जे व पुनर्गठित पीक कर्जाचे हप्ते.
- योजनेतंर्गत कर्जमाफी लाभ मर्यादा :- प्रति शेतकरी कमाल रु. 2 लाखापर्यत.
- योजना अंमलबजावणीचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | कर्जखातीसंख्या रक्कम/ |
|---|---|---|
| 1 | योजनेच्या प्रणालीवर बँकांमार्फत सादर केलेली कर्जखाती | 35.19 लाख |
| 2 | प्राथमिक छाननीमध्ये अपात्र ठरलेली कर्जखाती | 2.29 लाख |
| 3 | बँकामार्फत रदद् /Delete केलेली कर्जखाती | 65876 |
| 4 | योजनेतंर्गत लाभासाठी उपयुक्त कर्जखात्यांची संख्या | 32.91 लाख |
| 5 | प्राथमिक छाननी करुन प्रसिध्द केलेली खाती(विशिष्ठ क्रमांक VK) | 32.91लाख |
| 6 | विशिष्ठ क्रमांकापैकी शेतक यांकडून-आधार प्रमाणीकरण केलेली कर्जखाती | 32.42 लाख |
| 7 | आधार प्रमाणीकरण झालेल्या पैकी कर्जमाफीचा लाभ दिलेली कर्जखाती संख्या व रक्कम | 32.27 लाख<br>रक्कम रु. 20497 कोटी |

- योजनेअंतर्गत प्राप्त अर्थसंकल्पीय तरतुद रु. 20613.45 कोटी असून संपूर्ण तरतूद कोषागारातून आहरित करण्यात आली आहे. सदर योजनेच्या बँक खात्यावर एकूण रु. 53.20 कोटी शिल्लक आहेत.

- योजनेतंर्गत प्रलंबित कामकाजाचा तपशील व आवश्यक निधी-

| अ.क्र. | तपशील | कर्जखाती संख्या | रक्कम रुकोटी. |
|---|---|---|---|
| 1 | तक्रार प्रलंबित कर्जखाती | 449 | -- |
| 2 | बॅंकांच्या तांत्रिक अडचणीमुळे लाभ हस्तांतरण अयशस्वी ठरलेली कर्जखाती (FailedPayment) | 4815 | 29.48 |
| 3 | लाभ वितरित परंतु बॅकेकडून प्रतिसाद प्रलंबित कर्जखाती (Response Pending) | 2180 | 10.82 |
| 4 | लाभ रोखून धरलेलीमंजूर न केलेली / कर्जखाती (Allotment onhold) | 3151 | -- |
| | एकूण | 10595 | |

सदर योजनेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी सहकार आयुकत कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध आहे. महा-आयटीकडील दि. 03/11/2023 रोजीच्या ई-मेलद्वारे योजनेसाठी रु.35 कोटीची आवश्यकता कळवली आहे. सदर योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना

१. शासन निर्णय दि. २९/०७/२०२२
२. योजनेतंर्गत पात्र कर्जे- नियमित परतफेड केलेली पीक कर्जे
३. पात्र कर्जाचा कालावधी- सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन वर्षापैकी कोणतीही दोन वर्षे
४. योजनेतंर्गत प्रोत्साहनपर लाभ मर्यादा- कमाल रु. ५० हजार पर्यत
५. योजना अंमलबजावणीचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | कर्जखाती संख्या रक्कम |
|---|---|---|
| १ | योजनेतंर्गत बॅंकामार्फत सादर कर्जखाती | २८.७७ लाख |
| २ | योजना निकषानुसार अपात्र कर्जखाती | १३.१९ लाख |
| ३ | प्राथमिक छाननी करुन प्रसिध्द केलेली खाती(विशिष्ठ क्रमांक) | १५.५८ लाख |
| ४ | आधार प्रमाणीकरण केलेली कर्जखाती | १५.५० लाख |
| ५ | कर्जमाफीचा लाभ वर्ग करण्यात आलेली कर्जखाती | १४.५० लाख कर्जखाती, रक्कम रु. ५२४९ कोटी. |
| ६ | रक्कम वर्ग होऊ न शकलेली कर्जखाती | ११८५ रु. ३.९० कोटी |
| ७ | आधार प्रमाणीकरण न झालेली कर्जखाती | ८१६९ |

सदर योजनेअंतर्गत प्राप्त अर्थसंकल्पीत तरतुद व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पीत तरतुद रु. कोटी | आहरित तरतूद रु. कोटी | प्रत्यक्ष खर्च व लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५७१४.०० | ५४४०.६५ | योजना पोर्टलप्रमाणे १४.५० लाख कर्जखाती, रक्कम रु. ५२४९ कोटी. |
| | | | योजना अंमलबजावणी खर्च रु. २५.३२ कोटी<br>बॅंक खात्यावरील शिल्लक रु. १३३.२४ कोटी |

सदर योजना पुर्ण करण्यासाठी या कार्यालयाच्या स्तरावर पुरेसा निधी उपलब्ध आहे.

**योजनेचे नाव -:डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना**

**शासन निर्णय:-** शासन निर्णय क्रमांक सीसीआर 1491/प्र.क्र.714/2-स, दि.02.11.1991 अन्वये दि.01.04.1990 पासून पीक उत्पादन प्रोत्साहन योजना या नावाने सदरची योजना अंमलात आली आहे. दि.26.04.1999 च्या शासन निर्णयान्वये योजनेचे नाव डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना असे करण्यात आले.

**योजनेचा उद्देश:-** पीककर्जाची वसुली मुदतीपूर्वी होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.

1. शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदती पीककर्जाची संपुर्ण परतफेड प्रतीवर्षी दि. 30 जून पूर्वी केल्यास शेतकऱ्यांना शासनाकडून व्याज सवलत अनुदान स्वरुपात देण्यात येत आहे.
2. दि. 11/06/2021 रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. तीन लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी 3 टक्के दराने व्याज सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला

3 या योजनेअंतर्गत अनुसुचित जातीच्या शेतकऱ्यांना विशेष घटक योजनेअंतर्गत व्याज सवलत देण्यात येत आहे.

1. शासनाने दिनांक 18.06.2007 रोजी कायदा कलम 79 (अ) अन्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विकास संस्थांना निर्देश देऊन शेतकरी जर पीककर्जाची संपुर्ण परतफेड प्रतीवर्षी 30 जून पूर्वी करीत असेल तर अशा शेतकऱ्यांकडून फक्त कर्ज मुद्दल वसुल करण्याबाबत व या कर्जावरील व्याजाची रक्कम शासनाकडे मागणी करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.
2. पीक कर्जाची परतफेड शेतक-यांनी विहित मुदतीत केल्यास त्यांना केंद्र शासनाच्या त्याचप्रमाणे प्रस्तुत योजनेचा लाभ मिळून रु. तीन लाखापर्यतचे पीक कर्ज बिन व्याजी उपलब्ध होत आहे.

**3.अर्थसंकल्पीय तरतुद व खर्च :-**

| वर्ष | तरतुद रु.कोटी | खर्च रु.कोटी | लाभार्थी संख्या (लाख) |
|---|---|---|---|
| 25-2024 | 300 | 127 | 510. |
| 24-2023 | (100 + 360) 460 | 368 | 11.25 |
| 2022-23 | 532 | 430.24 | 27.35 |

राज्य शासनाचे वित्त विभागाकडील दि. 08/06/2022 रोजीच्या शासन निर्णयामध्ये वैयक्तिक लाभांच्या योजनांच्या सर्व लाभार्थ्यांचा डेटाबेस तयार करुन तो आधारशी संलग्न करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सदर योजनेतंर्गत व्याज सवलत प्रस्ताव सादर करताना बॅकांनी लाभार्थ्याचा आधार क्रमांक नमुद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तथापि सदर योजनेची अंमलबजावणी संगणकीय प्रणालीद्वारे केल्यास आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यावर व्याज सवलतीची रक्कम थेट लाभ वितरण प्रणालीद्वारा वितरित करता येईल.

**योजनेचे नांव :-बॅकांसाठी व्याज परतावा योजना (2.5% व 1%)**

**शासन निर्णय** :- सदरची योजना शासन निर्णय क्रमांक सीसीआर-1406/प्र.क्र.247/2-स, दि.17.05.2006 अन्वये अंमलात आली.

**योजनेचा उद्देश :-** राज्यातील शेतकऱ्यांना वार्षिक सहा टक्के व्याज दराने अल्पमुदती पीक कर्ज पुरवठा होण्यासाठी बँकांना व्याज परतावा देणे

**योजनेचे स्वरुप :-**

1. शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने उत्पादन तथा पीक कर्ज उपलब्ध होण्यासाठी बँकांनी सात टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा केल्यास केंद्र शासना कडून एक टक्का दराने व्याज परतावा देण्यात येतो. याच धर्तीवर बँकांनी सहा टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा केल्यास राज्य शासना कडून एक टक्का दराने बँकांना व्याज परतावा देण्यात येत आहे.
2. या योजने अंतर्गत राष्ट्रीयीकृत, प्रादेशिक ग्रामीण बँका व खाजगी बँकांना एक टक्का दराने व्याज परतावा देण्यात येत आहे.
3. या व्याज परतावा दरामध्ये दि.05.09.2014 च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी

व्याज परताव्याचा दर 2.5% करण्यात आलेला आहे.

4. ग्रामीण बँकांनी व जिल्हा मध्यवर्ती बँकांनी नाबार्ड कडून घेतलेल्या फेर कर्जावर व्याज परतावा अनुज्ञेय नाही.

5. या योजने अंतर्गत बँकांनी शेतकऱ्यांना दिलेल्या रु.तीन लाखा पर्यंतच्या पीक कर्जाचा समावेश होत असुन व्याज परतावा रकमेचा हिशोब कर्ज दिल्याच्या तारखे पासुन कर्ज परतफेड होणाऱ्या तारखे पर्यंत किंवा सदर कर्ज परतफेडीची मुदत संपेल त्या तारखे पर्यंत (खरीप हंगामासाठी 31 मार्च व रब्बी हंगामासाठी 30 जून) यापैकी जी तारीख आधीची असेल ती विचारात घेण्यात येत आहे.

**योजनेची अंमलबजावणी:-**

1. या योजने अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सभासद विविध कार्यकारी सहकारी संस्थांना चार टक्के दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देत असुन संबंधित विविध कार्यकारी सहकारी संस्था दोन टक्के गाळा आकारुन शेतकरी सभासदांना सहा टक्के व्याज दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देतात. त्याच प्रमाणे जिल्हा बँकांनी तथा राष्ट्रीयीकृत व ग्रामीण बँकांनी शेतकऱ्यांना थेट कर्जपुरवठा केल्यास अशा कर्जाचा व्याजदर सहा टक्के ठेवण्यात येतो.
2. या योजने अंतर्गत जिल्हा बँकांचे व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव बँकांचे वैधानिक लेखापरिक्षका मार्फत तपासून –प्रमाणित करुन बँकेचे निबंधक असलेले विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालया मार्फत सहकार आयुक्तालयाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात येतात. त्याच प्रमाणे राष्ट्रीयीकृत व ग्रामीण बँकांचे व्याज परतावा मागणी चेप्रस्ताव बॅकेच्या वैधानिक लेखापरिक्षकां मार्फत तपासुन/प्रमाणित करुन सहकार आयुक्तालयाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात येतात.
3. सहकार आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर बँकांकडून तथा क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मंजुर करुन अनुदान रकमेचे वितरण संबंधित बँकेस करण्यात येते.

**योजनेची फलनिष्पती:-** या योजनेमुळे राज्यातील शेतक-यांना 6% दराने पीक कर्जाची उपलब्धता बँकांकडून होण्यास मदत होत आहे.

**अर्थसंकल्पीय तरतुद व खर्च:-**

| **आर्थिक वर्ष** | **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका** (2.5%) | | **व्यापारी बँका** (1%) | |
|---|---|---|---|---|
| | **तरतूद रुकोटी .** | **खर्च रुकोटी .** | **तरतूद रुकोटी .** | **खर्च रुकोटी .** |
| 2024-25 | 360.38 | 200 | 316.28 | 59 |
| 2023-24 | 150 | 105 | 242 | 242 |
| 2022-23 | 100 | 70 | 115 | 95 |
| 2021-22 | 430 | 430 | 125 | 62.50 |
| 2020-21 | 175 | 0 | 100 | 16.50 |

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल अंशदान

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ५० मधील तरतुदीनुसार राज्य शासनास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील एकुण भागभांडवलाच्या २५% मर्यादेपर्यत भाग खरेदी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार राज्य शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भागभांडव्लामध्ये गुंतवणुक केलेली आहे.

